क्रमांक : पोमसं /८अ/आज्ञांकित कक्ष/१९५/२०१७ मुंबई, दिनांक : १८/११/२०१७

**विषय :-** पोलीस महासंचालक कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आज्ञांकित कक्षात उपस्थित राहताना घटक प्रमुखांची परवानगी घेण्याबाबत.

* * * *

## परिपत्रक :-

जिल्ह्यातील बरेचसे लिपीक बदली / पदोन्नतीच्या विनंतीच्या अनुषंगाने अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आज्ञांकित कक्षात गाऱ्हाणी मांडण्याकरीता येतात. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, सदरचे लिपीक हे रजा न घेता अथवा सीक रजेवर असतांना येतात. तसेच घटक प्रमुखाचे परवानगीशिवाय ते आज्ञांकित कक्षात येतात. ही बाब कार्यालयीन शिस्तीस अनुसरुन नाही.

२. जिल्ह्यामध्ये लिपीक कर्मचारी यांच्याकडे ठराविक टेबलची कामे सोपविलेली असतात. असे लिपीक गैरहजर राहिल्यास त्यांच्या टेबलचे कामकाज ठप्प राहते. त्यामुळे टेबलची कामे निष्कारण प्रलंबित राहतात व सार्वजनिक हित साध्य होत नाही. तरी, अशा लिपीकांविरुध्द कठोर कारवाई करणे आवश्यक ठरते.

३. तरी, घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचे कार्यालयातील लिपीकांना सूचना द्याव्यात की, ते रजा न घेता, सीक रजेवर असतांना घटक प्रमुखांची परवानगी न घेता आज्ञांकित कक्षात आल्यास त्याचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

४. तसेच, येथून पुढे जिल्ह्यातील कोणीही लिपीक त्यांचे गाऱ्हाण्यासंदर्भात आज्ञांकित कक्षात येताना घटक प्रमुखांची पुर्व परवानगी, रजा घेतली असल्यास रजेचे मंजूरी आदेश सोबत आणावेत.

१६/११/१७

( डॉ प्रज्ञा सरवदे )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल./ वाहतूक / दहशतवाद विरोधी पथक /लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग / मुंबई सह )
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे / पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर /नक्षल विरोधी अभियान, नागपूर /
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.रा., पुणे. / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महासंचालक, महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, मुंबई / ना.ह.सं., मुंबई
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / ओ.सी.बी. घटक कार्यालये / गु.अ.वि. घटक कार्यलयांसह).
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र.१ ते १६.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये.
प्राचार्य, अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.
उपसंचालक, गुन्हा अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक.

प्रत,

सर्व कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १ ते ४४

प्रत सविनय सादर,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.